# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार**

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे

फोन नंबर ०२२ - २९४५१००१

**Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट १०७/२०२५** **दि. ०५/०३/२०२५**

## प्रेस नोट

## अग्निशस्त्राचा धाक दाखवुन, ज्वेलर्स दुकानदार यास मारहाण करुन ज्वेलर्स दुकानात दरोडा घालुन जबरी चोरी करणाऱ्या सराईत आरोपीत यांचे टोळीविरुध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण (मकोका) प्रमाणे कारवाई करण्यास माणिकपुर पोलीस ठाणेस यश

----००----

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक १०/०१/२०२५ रोजी २१.१३ वा.चे सुमारास शॉप नं. ०६, लोटस बिल्डींग, कौल हेरिटेज सिटी, अग्रवाल, वसई पश्चिम ता. वसई जि. पालघर येथे तक्रारदार हे त्यांचे मयंक ज्वेलर्स दुकानात असतांना दोन २५ ते ३० वर्षे वयोगटातील अनोळखी इसमांनी येवुन त्यापैकी एक इसमाने पिस्टलचा धाक दाखवुन "चिल्लाओ मत" अशी धमकी देवुन पिस्टलच्या बटने तक्रारादार यांचे डोक्यात मारहाण करुन ९४९,५५० ग्रॅम वजनाचे अं.किं.रु. ७१,००,०००/- चे सोन्याचे दागिने चोरुन पळुण गेलेबाबत तक्रारदार नामे श्री. रतनलाल छगनलाल सिंघवी, वय ६९ वर्षे, यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. १६/२०२५ बी.एन.एस २०२३ चे कलम ३०९ (६), ३५१ (२), ३ (५), ६१ (२) सह शस्त्र अधिनियम कलम ३, २५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वर नमुद दाखल गुन्हयात आरोपीत नामे १) अनुज गंगाराम चौगुले, वय ३६ वर्षे, रा. रुम नं. १०६, ओम साई बाबा अपार्टमेंट, पहिला मजला, ९० फिट रोड, प्रगती नगर, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर, २) रॉयल ऊर्फ रॉय एडव्हर्ड सिक्वेरा, वय ४६ वर्षे, रा. मु.पो. सिक्वेरा बिल्डींग, गिरीज, टोकपाडा, ता. वसई, जि. पालघर, ३) लालसिंग ऊर्फ सिताराम सर्जेराव मोरे, वय ५६ वर्षे, रा. मु.पो. मोरेवाडी, ता. जि. सातारा, ४) सौरभ ऊर्फ पप्पु तुकाराम राक्षे, वय २७ वर्षे, रा. मु.पो. उंची ठाणे, ता. खटाव, जि. सातारा, ५) अमर भारत निमगिरे, वय २१ वर्षे, सध्या रा. लेक्चर कॉलनी, मस्जिदचे समोर, भालकी, जि. बिदर, कर्नाटक, मुळ रा. मु.पो. जेऊर, ता. करमाळा, जि. सोलापुर, महाराष्ट्र यांना अटक करण्यात आली असुन सदर सराईत आरोपीत यांचे टोळीकडुन कौशल्याने तपास करुन त्यांचेकडुन **एकुण रु. २३,३९,२००/- किंमतीचे २९७ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या लगड, ०१ ॲटोमॅटिक पिस्टल, ०१ जिवंत काडतुस, पल्सर मोटारसायकल, कोयता, कटर, कटावणी व मोबाईल फोन इ. साहित्य** जप्त करण्यात आले आहे.

सदर गुन्हयातील आरोपीत यांचे टोळीविरुध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) प्रमाणे वाढीव कलम लावुन सदर कायद्यातंर्गत कारवाई करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. नवनाथ घोगरे हे करत आहेत.

सदरची कारवाई मा. श्रीमती पौर्णिमा चौगुले/श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, मा. श्री. नवनाथ घोगरे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई, मा. श्री. हरिलाल जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. बालाजी दहिफळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि. सनिल पाटील, पो.उ.नि. सागर साबळे, पो.ह. शैलेश पाटील, पो.ह. शामेश चंदनशिवे, पो.ह. अनिल डावरे, पो.शि. संतोष म्हस्के, पो.शि. गोविंद लवटे, पो.शि. आनंदा गडदे, पो.शि. प्रविण कांदे, यांनी यशस्विरीत्या पार पाडली आहे.

-------------------------००-----------------------------